डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद संलग्नित

पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

## आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग

## वार्षिक अहवाल

## २०१८-२०१९

प्राचार्य
डॉ.एस.आर.टकले

कार्यक्रमाधिकारी
डॉ.पी.एस.कल्याणकर

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

## आजीवन शिक्षण व विस्तार विभाग

## २०१८ - २०१९

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशिल |
|---|---|
| १ | महाविद्यालयीनस्तरावरील उपक्रम |
| २ | समाजस्तरावरील उपक्रम |
| ३ | विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा |
| ४ | स्वंयनिर्वाही अभ्यासक्रम<br>(Self Financed Certificate Courses): |
| ५ | कृतीयूक्त फोटो अहवाल |
| ६ | वर्तमानपत्रातील प्रसिद्धी |
| ७ | विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेची निमंत्रण पत्रिका |

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

## आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग

## वार्षिक अहवाल

## २०१८-२०१९

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री च्या आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ मध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे ढोबळमानाने महाविद्यालयस्तरावरील उपक्रम, समाजस्तरावरील उपक्रम, विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा असे तीन भागात विभाजन करता येते. तसेच विभागाच्या वतीने दोन स्वयंनिर्वाही अभ्यासक्रम सुध्दा चालविले जातात.

**१. महाविद्यालयस्तरावरील उपक्रमः**

**१.१ रोपांची निर्मीती व वाटपः**

विभागाच्यावतीने जुलै २०१८ च्या पहिल्या व दुसऱ्या आठवड्यात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या साह्याने रोपे तयार करण्यासाठी मातीने पिशव्या भरून घेण्यात आल्या. या पिशव्यांमध्ये शेवगा, लिंब, जांभूळ, आंबा या प्रकारची १२५ झाडे तयार करून, त्यांचे वाटप विद्यार्थ्यांना करण्यात आले.

**१.२ सिड्स बॉलची निर्मिती :-**

साकला ग्रुपच्या वतीने दिनांक ३१ जुलै २०१८ रोजी महाविद्यालयात सिड बॉल निर्मितीच्या उपक्रमाचे आयोजन केले गेले, यामध्ये आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या स्वंयसेवकांनी सहभाग घेतला. सिड्स बॉल तयार करण्यासाठी माती व कुजलेल्या शेणखतास एकत्र केले. त्यात पाणी टाकूण त्याचे गोळे तयार केले व त्या गोळ्यांमध्ये विविध वनस्पतीच्या बीया टाकण्यात आल्या. हे सिड्स बॉल वाळल्यानंतर त्यांना डोंगर माथ्यावरून खाली सोडले जाते. या उपक्रमात स्वंयसेवकांनी जवळपास ३०० सिड्स बॉल तयार केले.

१.३ विद्यापीठ वर्धापनदिनी व्याख्यानाचे आयोजन :-

दिनांक २३ ऑगस्ट २०१८ रोजी आजीवन शिक्षण विस्तार विभागाच्या वतीने महाविद्यालयस्तरावरील उपक्रमांतर्गत व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. उमाकांत राठोड (प्रतिष्ठाण महाविद्यालय, पैठण) तर प्रमुख उपस्थिती डॉ. उल्हास उढाण (देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद) यांची लाभली. डॉ. उमाकांत राठोड यांनी भारतातील उच्च शिक्षणाचा विकास या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. या विषयावर बोलतांना ते म्हणाले की, 'भारतातील उच्चशिक्षणाची परंपरा मोठी आणि अतिप्राचीन अशी आहे. अतिप्राचीन काळापासून शिक्षणाने मानवाची आणि एकूणच समाजाची उन्नती साधली आहे.' समाजव्यवस्थेची घडी बळकट करण्यासाठी सिमेंटरूपी शिक्षणाची गरज असते. या देशातील शिक्षण जर मजबूत करायचं असेल तर प्राथमिक शिक्षण मजबूत करावे लागेल. शिक्षण ही समाजाची अत्यावश्यक गरज आहे, ती सरकारने पुरवली पाहिजे. कारण कल्याणकारी समाज निर्मितीसाठी शिक्षण महत्त्वाची भूमिका बजावते. शिक्षणाने समाजाचा शाश्वत विकास होतो. तसेच जगण्याची क्षमता वाढीस लागणे, हा उद्देश शिक्षणाने साध्य केला पाहिजे. परंतु अलिकडे असे होतांना दिसत नाही तर आजच्या शिक्षणाने माणूस पंगू बनत चालला आहे. अशा पंगू बनत चाललेल्या शिक्षणासाठी संघर्ष करण्याची ताकद, उच्च शिक्षणाने निर्माण केली पाहिजे. चांगल्या शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झाले पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले. तसेच स्वातंत्र्यानंतर शिक्षणासंदर्भात नेमलेल्या विविध कमिशनची माहिती त्यांनी दिली.

कार्यक्रमाची रूपरेषा डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी मांडली. अध्यक्षीय समारोप प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांनी केला. तर उपस्थित पाहुण्यांचे आभार कु. हर्षदा खोंडे या विद्यार्थीनीने मानले. सूत्रसंचालन कु. अश्विनी बनसोडे हिने केले. पाहुण्यांचा परिचय कु. विद्या जाधव हिने करून दिला. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

१.४ **आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनी व्याख्यानाचे आयोजन :-**

दि. ८ सप्टेंबर २०१८ रोजी आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाचे औचित्य साधून विभागाच्या वतीने "साक्षरता काळाची गरज या विषयावर डॉ. प्रशांत देशमुख (विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, श्री. संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव) यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या विषयावर बोलतांना ते म्हणाले की, "युनेस्कोने १९६६ रोजी ८ सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस साजरा करण्याचे जाहीर केले. १९६७ मध्ये हा दिवस प्रथमतः साजरा करण्यात आला. साक्षरतेचे व्यक्तीगत, सामूहिक व सामाजिक जीवनातील मुद्यावर प्रकाश टाकणे हा या दिवस साजरा करण्यामागे हेतू आहे. भारतात साक्षरता वाढवण्यासाठी विविध कार्यक्रम राबवीले गेले. त्यांचा हेतू साक्षरतेबरोबरच मानवी जीवनाची गुणवत्ता वाढविणे हा होता.

लिहण्या वाचण्याच्या साक्षरतेबरोबर वित्तीय साक्षरता सुद्धा काळाची गरज असल्याचे मत त्यांनी मांडले. भारतात साक्षरतेच्या दरात स्त्री व पुरूष साक्षरतेमध्ये तफावत आहे ती दुर झाली पाहिजे. शिक्षणातील गळतीचे प्रमाण कमी व्हावे साक्षरतेतून एक सूजान नागरिक निर्माण व्हावा असे मत त्यांनी मांडले.

कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करतांना उपप्राचार्य डॉ. कल्याणकर पांडुरंग यांनी संगणक साक्षरता काळाची गरज आहे. सध्याच्या सरकारने बरीचशी कार्यालयीन कामे ऑनलाईन केल्याने प्रत्यक्ष कार्यालयात जाण्याची गरज नाही. परंतु त्यासाठी संगणक साक्षरता काळाची गरज असल्याचे मत त्यांनी मांडले.

कार्याक्रमाचे सुत्रसंचालन कु. अश्विनी बनसोडे हिने केले. सुविचार - जयश्री वाघने सांगीतला, प्रार्थना पुजा प्रधाने म्हटली तर पाहूण्यांचा परिचय मानसी पवार ने करून दिला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी श्री. राजू खरात व श्री. लक्ष्मण ठेपले, श्री. निराशे यांनी सहकार्य केले.

### १.५ विद्यापीठ नामविस्तार दिनानिमित्त व्याख्यानाचे आयोजन :-

दिनांक १४ जानेवारी २०१९ विभागाच्या वतीने महाविद्यालयस्तरावरील कार्यक्रमात विद्यापीठ नामविस्तार दिनानिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. संतोष तांदळे (पंडित नेहरू महाविद्यालय, औरंगाबाद) यांनी 'विद्यापीठ नामविस्तार चळवळीतील नेतृत्व' या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी प्रमुख उपस्थिती श्री. रमेश तुपे यांची लाभली. तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले उपस्थित होते. कार्यक्रमाची भूमिका विभागाचे समन्वयक, डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी मांडली.

यावेळी बोलत असतांना डॉ. तांदळे म्हणाले की, मराठवाड्यात अतिशय व्यापकपणे हा लढा लढला गेला आहे. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली, तसेच सर्वांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. त्यामुळे विद्यापीठाला त्यांच नाव द्यावे असा आग्रह अरूण कांबळे, नामदेव ढसाळ, गंगाधर गाडे यांचा होता. हा लढा खरा स्वातंत्र्य, समता व बंधुता जोपासण्याचा लढा होता. आणि मराठवाड्याची अस्मिता तेवत ठेवता यावी म्हणून या काळात अनेक नेतृत्व पुढे आली. असे सांगत विद्यापीठ नामविस्ताराचा इतिहास त्यांनी मांडला. प्रमुख उपस्थितीत म्हणून लाभलेल्या श्री. रमेश तुपे या माजी विद्यार्थ्याने उपस्थितांना मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांनी केला. तर सूत्रसंचालन कु. दिपाली बोलकर व कु. मानसी पवार या विद्यार्थीनींने केले. यावेळी सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित राहिले.

## २. समाजस्तरावरील उपक्रम :-

### २.१. निधोना येथील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन :- (करिअरच्या संधी)

दिनांक ४ जुलै २०१८ रोजी प्रभात माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, निधोना ता. फुलंब्री येथील १२ वीच्या विद्यार्थ्यांना करिअरच्या संधी या संदर्भात श्री. गजानन हरकळ यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले गेले. त्यांनी प्रोजेक्टरच्या

साहाय्याने विविध क्षेत्रातील शिक्षणाच्या संधी व त्यानंतर नोकरीच्या संधींची माहिती दिली. तसेच राज्य लोकसेवा आयोग व केंद्रीय लोकसेवा आयोगाद्वारे विविध पदांसाठी घेतल्या जाणाऱ्या परीक्षांची माहिती दिली.

यावेळी संबंधित विद्यालयाचे प्राचार्य श्री. आशोक पिंपळे सर उपस्थित होते. कार्यक्रमाची रूपरेषा डॉ. कल्याणकर पी. एम. यांनी करून दिली. तर आभार डॉ. रामकिसन लागटे यांनी मानले. कार्यक्रमाच्या आयोजनात डॉ. सुरेश मुंढे व डॉ. आश्विन रांजणीकर यांनी सहकार्य दिले.

**२.२ आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनी रॅलीचे आयोजन व पथनाट्य सादरीकरण :-**

विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाचे औचीत्य साधून दि. ८ सप्टेंबर २०१८ रोजी रॅलीचे आयोजन केले. ही रॅली महाविद्यालयातून काढण्यात आली. रॅली सिल्लोड - फुलंब्री रस्त्याने खुलताबाद टी पॉईंट - पुढे काथार गल्लीतून - बाजार गल्ली- व महाविद्यालयात आणण्यात आली. रॅलीमध्ये सहभागी विद्यार्थ्यांच्या हातात साक्षरतेचे महत्त्व पटवून देणारे घोषवाक्य, लिहलेले फलक होते. विद्यार्थी ठिकठिकाणी; साक्षर-जनता भूषण-भारता, साक्षरतेचा दीवा-घरोघरी लावा, शिकलेली आई-घरादारास पुढे नेई अशा घोषणा देत होते.

रॅलीमध्ये महाविद्यालयासमोर, फुलंब्री बसस्थानकात, खुलताबाद टी पॉईंट - जून्या पोलिस स्टेशन समोर "साक्षरता काळाची गरज" या पथ नाट्याचे सादरीकरण करण्यात आले. निरक्षर मानसाची शासकीय कार्यालयात कशी फसवणूक होते. त्याच्या निरक्षरपणाचा त्यास कसा मोबदला चुकवावा लागतो. हा संदेश या पथनाट्यातून देण्यात आला.

पथनाट्यात रोहीत शिंदे, हर्षदा खोंडे, विद्या जाधव, सुप्रीया जाधव, शिवम जाधव, अमोल डकले, पुजा केजभट, यांनी विविध भूमिका वठवल्या तर मृणाल मनोरकर या स्वंयसेविकेने निवेदन केले. हे पथनाट्य श्री. पंकज साळवे या माजी विद्यार्थ्याने बसविले.

या रॅली व पथनाट्याच्या आयोजनासाठी कार्यक्रमाधिकारी डॉ. पांडुरंग कल्याणकर, प्रा. नितीन माळेगावकर, डॉ. संजय पांचाळ यांनी परिश्रम घेतले.

**२.३ प्रजासत्ताक दिनी दरेगाव (दरी) येथे व्याख्यान :-**

दि. २६ जानेवारी २०१९ रोजी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून विभागाच्यावतीने दरेगाव (दरी) ता. फुलंब्री येथे "गाव विकासात ग्रामपंचायतींची भूमिका" या विषयावर डॉ. रामकिसन लोमटे व प्रा. बाबासाहेब लहाने यांच्या व्याख्यानांचे आयोजन केले. यावेळी बोलतांना डॉ. लोमटे म्हणाले की, "गावाच्या आर्थिक व सामाजिक विकासात ग्रामपंचायती महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. गावातील लोकांचे आरोग्य व शिक्षण या दोन बाबी गावाच्या विकासात महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे ग्रामपंचायतींनी आरोग्यासाठी स्वच्छतेवर व शिक्षणाच्या गुणवत्तेवर लक्ष द्यावे."

यावेळी मार्गदर्शन करतांना प्रा. बाबासाहेब लहाने म्हणाले की, "भारतीय राज्यघटनेतील अधिकार व कर्तव्य नागरिकांनी समजावून घ्यावेत व त्याचा वापर करावा. ग्रामपंचायतीतील महिला सदस्यांनी आपल्या अधिकाराचा वापर करून कार्यक्षम व्हावे." यावेळी दरेगाव दरीचे ग्रामसेवक श्री. सुरडकर आर. एस. यांनी कुष्ठरोग निर्मुलनाची शपथ दिली. ग्रामसभा आयोजनासाठी क्षेत्रीय अधिकारी म्हणून काम पाहणाऱ्या सौ. प्रमीला कुंभारे उपस्थित होत्या. त्यांनी ग्रामसभा शांततेत आयोजित करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. कल्याणकर पी. एम. यांनी केले, सुत्रसंचालन डॉ. महेश थोरात, श्री. नितीन माळेगावकर यांनी केले. कार्यक्रमाचे आभार कु. ज्योती उदये या स्वंयसेविकेने मानले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप श्री. शामराव मालोदे यांनी केला. यावेळी सरपंच शोभाताई बाजीराव मालोदे, उपसरपंच पुंडलिक दुधे, सर्व ग्रामपंचायत सदस्य, तसेच श्री. नानाभाऊ मालोदे, सखाराम मालोदे, बाबुराव मालोदे, धनाजी दुधे, विठ्ठल दुधे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. राजश्री पवार, प्रा. विजय पांडे, डॉ. मंजुषा नळगिरकर, प्रा. डॉ. संजीवकुमार पांचाळ, श्री. राजू खरात यांचे सहकार्य लाभले.

## ३. विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा :-

महाविद्यालयाच्या आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने दिनांक १८ व १९ डिसेंबर २०१८ या कालावधीत दोन दिवसीय, विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन केले गेले. या कार्यशाळेत विविध सत्रांचे आयोजन केले गेले.

### ३.१ सत्र पहिले : उद्‌घाटन सत्र -

कार्यशाळेचे उद्‌घाटन डॉ. संजय मून (संचालक, आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलतांना ते म्हणाले की, "मनुष्यबळ विकसित करण्यासाठी शिक्षण आहे. शिक्षणाने बौद्धिक व मानसिकदृष्ट्या व्यक्ती समर्थ झाला पाहिजे. घेतलेले शिक्षण व्यक्तीच्या जीवनाला उपयोगी असले पाहिजे. त्यासाठी अधिकाधिक कार्यात्मक अभ्यासक्रम होणे गरजेचे आहे, असे मत त्यांनी मांडले."

### ३.२ सत्र दुसरे : लेखन कौशल्य -

या विषयावर बोलतांना डॉ. आनंद उबाळे (सहयोगी प्राध्यापक, इंग्रजी विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद) म्हणाले की, का लिहावे ? काय लिहावे ? हे प्रश्न महत्त्वाचे आहेत. ज्ञान निर्मिती करणे हा शिक्षणाचा हेतू आहे. यावेळी त्यांनी भाषेच्या उद्‌गमाचे विविध सिद्धांत समजावून सांगितले. यावेळी ते म्हणाले की, समाजाच्या कल्याणासाठी उपयोगी पडणारे लिखाण चांगले समजावे.

### ३.३ सत्र तिसरे :- संभाषण कौशल्य -

या विषयावर बोलतांना डॉ. उत्तम अंभोरे (विभाग प्रमुख, इंगजी विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद) म्हणाले की, संभाषण कौशल्य विकसित होण्याअगोदर पूर्वजांनी लावलेले शोध मौखिक ठेवले. आपली कल्पना दुसऱ्या लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी उत्तम संभाषण कौशल्याची गरज आहे. आता

संभाषण कौशल्याचा संबंध केवळ नोकरीशी जोडला जातो. परंतु संभाषण कौशल्य अवगत असणाऱ्यास व्यापक संधी आहेत. उत्तम संभाषण असलेला चांगला अभिनेता किंवा नेता बनू शकतो.

कार्यशाळेच्या पहिल्या दिवसाचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी केला. कार्यशाळेचा हेतू प्रास्ताविकातून डॉ. कल्याणकर पी. एम. यांनी मांडला.

पहिल्या दिवशीच्या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. महेश थोरात, श्री. लक्ष्मीकांत हेपले यांनी केले, तर आभार कु. ज्योती उदये या स्वंयसेविकेने मानले.

**मंगळवार दिनांक १९ डिसेंबर २०१८**

**३.४ सत्र चौथे : स्पर्धा परीक्षांना सामोरे जातांना :**

या विषयावर मार्गदर्शन करतांना डॉ. भागवत वाघ म्हणाले की, स्पर्धा परीक्षेची तयारी करतांना स्पर्धकांनी प्रथमतः अभ्यासक्रम माहीत करावा त्यानंतर मूळ संकल्पना समजावून घ्याव्यात. संदर्भ ग्रंथांचे वाचन करावे, स्वतःच्या नोट्स विकसित कराव्यात. वेळेचे नियोजन करावे त्यासाठी लेखन कौशल्य विकसित करावे. या सत्राचा अध्यक्षीय समारोप डॉ. महेश थोरात यांनी केला.

**३.५ सत्र पाचवे : करिअर मार्गदर्शन** –

पाचव्या सत्रात करिअरच्या संधी या विषयावर बोलतांना श्री. गजानन हरकळ यांनी प्रोजेक्टरच्या साहाय्याने १० व १२ वी नंतर करावयाचे विविध अभ्यासक्रम व त्यानंतर नोकरीच्या संधी या संदर्भात मार्गदर्शन केले. तर पदवीनंतर विविध विभागांमार्फत घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षांची माहिती दिली. पुढे बोलतांना ते म्हणाले की, प्रत्येक व्यक्तींची आवड निवड वेगवेगळी असते. त्यामुळे व्यक्तीची आवड, क्षमता व संधी या तीन गोष्टीची जुळवाजुळव केली की, करिअर घडवता येते.

**३.६ सत्र सहावे : नोकरी संदर्भातील परिचय पत्र -**

दुसऱ्या दिवशीच्या समारोप सत्रात नोकरी संदर्भातील परिचय पत्र व विषयावर प्रा. विजय पांडे (इतिहास विभाग) व डॉ. मंजुषा नळगिरकर (समाजशास्त्र विभाग) यांनी मार्गदर्शन केले. उमेद्वाराने नोकरीसाठी अर्ज करीत असतांना शैक्षणिक पात्रतेबरोबरच त्याला अवगत असलेली कौशल्य त्या परिचय पत्रात नोंदवावीत. जेणेकरून नोकरीसाठी त्याचा विचार होईल.

या दुसऱ्या दिवशीचे सुत्रसंचलन कु. ज्योती उदये या विद्यार्थीनीने केले. तर आभार प्रा. बाबासाहेब लहाने यांनी मानले. या दोन दिवसीय कार्यशाळेचा लाभ जवळपास ७० विद्यार्थ्यांनी घेतला.

## ४. स्वंयनिर्वाही अभ्यासक्रम : (Self Financed Certificate Courses)

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाने महाविद्यालयास विक्री प्रतिनिधी व कम्यूनिकेटीव्ह इंग्लिश हे दोन स्वंयनिर्वाही अभ्यासक्रम मंजूर केले. यातील विक्री प्रतिनिधी या अभ्यासक्रमास २९ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला व या अभ्यासक्रमाच्या समन्वयाचे काम डॉ. महेश थोरात व प्रा. नितीन माळेगावकर यांनी केले. कम्यूनिकेटीव्ह इंग्लिश या अभ्यासक्रमास ६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला व त्याचे समन्वयक म्हणून डॉ. आश्विन रांजणीकर यांनी काम पाहिले.

**कार्यक्रमाधिकारी**
**डॉ. पी. एम. कल्याणकर**

**प्राचार्य**
**डॉ. एस. [illegible] एकले**
प्राचार्य
श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय
फुलंब्री, जि. औरंगाबाद

Pandit Dindayal Upadhyay Education Society's

# SHRI SANT SAVTA MALI GRAMIN MAHAVIDYALAYA,

PHULAMBRI, Tq. Phulambri, Dist. Aurangabad

**Affiliated to**

**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad**

## Department of Lifelong Learning and Extension

# Annual Report

# 2018-2019

**Principal**

**Dr. S. R. Takle**

**Programme Officer**

**Dr. Kalyankar P.M.**

Pandit Dindyal Upadhaya Education Society's

# Shri Sant Savta Mali Gramin Mahavidyalaya, Phulambri

Tq. Phulambri, Dist. Aurangabad

# Lifelong Learning and Extension Department

## Annual Report

## 2018 - 2019

Lifelong Learning and Extension Department of our college has been organized various programme at Community level and College level during 2018-19. Department have also taken two days Students Counseling and Career Guidance workshop. As well as during this year department has also run two Self Finance Certificate Courses .

### 1) Extension Activity at College Level:

#### 1.1) Plant Creation and Distribution:

Caribages has been fill up by soil to creates various types of plants with the help of students in the first and second week of July 2018 and grown plants has been distributed among the students.

#### 1.2) Seed Ball Creation:

Volunteers have been involved in the programme arranged by Sakala Group of creation of seed balls on 31st July, 2018. Ball has been prepared by maxing soil and manures; seeds of various plants are swing among these seeds balls. Near about 300 seeds ball has been prepare by volunteers.

#### 1.3) Special Lecture on the Occasion of University Foundation Day:

Department has organized Special lecture on 23rd August 20178 on the occasion of University Foundation Day Dr Umkant Rathod ( Pratisthan College Paithan ) in the college campus. He has delivered speech on **Development of Higher Education in India.** He has pointed out that, India has great tradition of Higher Education. Education is help full to develop human life. To strengthen the education system, we must focus to strengthen the primary education system. Education becomes as essentials goods, so it is duty of government to provide it, for achieve welfare goal. He also give information about various commissions report on Education after independents.

Concluding remark of programme made by Principal, Dr. S. R. Takle. Dr. Ulhas Udhan has present in this programme as guest. Introductory speech given by Dr. Kalyankar P.M., Volunteer Ashvine Bansode has anchored the programme. Harshda khonde delivered gratitude of this programme. Vidhya Jadhav has introduce the Chief guest

### 1.4) Special Lecture on the Occasion of International Literacy Day:

Special lecturer has been arranged on the occasion of international literacy day on 8th September 2018. Dr. Prashant Deshmukh ( Head Department of Economics, Sant Daneshwar College, Soygan) has delivered lecturer on Education is Need of Time. He has given information about propose of celebration of this day. He pointed out that, various programme has been run by government to increase literacy rate , these programme has also focoused on develop quality of Human life.

Concluding remark of programme has made by Dr. Kalyankar P.M., he has given emphasis on Computer Literacy. Volunteer Ashvine Bansode has anchored the programme. Mansi Pawar has introduced the Chief guest. Volunteers Jayshri Wagh, Raju Kharat , Laxman Dheple, Nirase have helped in the smooth conduction of this programme.

### 1.5) Arranged Lecture on the occasion of University Name Expansions Day:

14th January 2019 celebrated a Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad name Expansion Day. On the eve of that day department organized Lecture of Dr. Santosh Tandale ( Pandit Neharu College, Aurangabad ). Guest of the programme delivered speech on Leadership in the University Name Expansion. He pointed out that, Dr. Babasaheb Ambedkar has open the doors of Higher Education for the common people of the society through establishing higher education society in Marathwada region. Speaker has also given information about various leaders contribution in the name expansion movement of University.

Alumni of College, Shri Ramesh Tupe has also delivered his view on the this movement .

The chairperson of this programme was Dr. S.R. Takle. Dr. Kalyankar P.M. introduced the programme, Volunteer Dipali Bolkar and Mansi Pawar has anchored the programme.

### 1.6) Participation in University Level Training Programmes:

Department of Lifelong Learning and Extension of Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad arranged training programme for Principal, Programme Officers, Volunteers on following dates our collage participation in those training are follow:

| Sr. No. | Training | Date | Participant |
|---|---|---|---|
| 01 | For Programme Officers | | Dr. Kalyankar P.M. |
| 02 | For Volunteers | 26/09/2018 | Dipali Bolkar (BASY)<br>Raju Kharat (BASY)<br>Seema Jadhav (BASY)<br>Joti Udee (BATY) |

## 2) Extension Activity at Community Level:

### 2.1) Arranged Lecturer at Nidona ( On Carrier Guidance)

Lifelong Department has arranged lecturer at Prabhat Secondary and Higher Secondary School, Nidhona on carrier opportunity in various sector. Shri Gajana Harkal has guided students with the help of PPT on projector. He has also give information to students about various competitive examination arranged by various Government bodies.

Principal of Prabhat Higher Secondary school is present in this programme. Dr. P.M. Kalyankar made introduction of programme. Dr Ramkisan Lomte has gratitude the programme . Dr Suresh Mundhe and Dr. Ashvin Rajanikar are help for smooth conditions of this programme.

### 2.2) Rally and Road Show on the occasion of Republic Day:

Department has arranged rally on the occasion of International Literacy Day in Phualmbri city. The Various slogans on Literacy are in the hands of Volunteers. The route of the really was College – Sillod road to Phulambri Bus Stands – Khultabad T point – Kathar Galli – Bazar Galli to College.

In between the rally volunteers has presented road show on the theme of Literacy Is Need of Time. In this road show volunteers has given the massage to society that how the illiterate person has robbed by some one else.

Rohot Shinde, Harshada Khonde, Vidhya Jadhav , Shivam Jadhav, Amoal Daklae, Puja Kejbhat has doing various role in this road show and Mrunal Manorkar has given the massage. Alumni of the college Pankj Salve has helped to seat up the road show. Programme officer Dr Kalyankar Pandurang, Dr Sanjaykumar Panchal, Shri Malegaonkar Nitin are actively participated for arranged the programme.

**2.3) Arranged Lecture at Dargaon ( Dari) on the occasion of Republic Day:**

Special lecturers has been arranged at Dargaon (Dari ) on the occasion of republic Day. The theme of the lecturer was Role of Grampanchat in the development of Village. The speaker Dr. Ramkisan Lomte has pointed out that grampanchat doing importance role in the economic and social development of village. He suggested that grampanchat have to give emphases on cleanliness for health and on the quality of education.

Another speaker Shri Babasaheb Labane told that, people must know the rights and duties given to them by Indian constitutions. Woman members of panchayat must actively participate in the functions of gram panchayat.

Gram Sevak Shri Surdakar R.S. has given the oath of Eradication of Leprosy to the villagers.

Shri Shamrao Malode has given presidential remark of the programme . Dr. P.M. Kalyankar made introduction of programme. Dr Mahesh Thorat and Shri Nitin malegaonkar have anchored the programme. Joti Udde has gratitude the programme.

Sarpanch Shobha Malode, Vive Serpanch Pundalik Dudhe, and other member of Gram Panchat , Nana Malode, Skharm Malode, Baburao Malode, Dhanaji Dudhe,Vittal Dudhe and may villagers of Daregaon Dari are presented for this programme. Dr Rajarshi Pawar, Associate Prof. Vijay Pande, Dr. Manjush Nalgirkar, Dr. Sanjivkumar Panchal, Shri Raju Kharat are help for smooth conditions of this Programme.

## 3) Student Counseling and Carrier Guidance Camp

Department had organized two day workshop on 18th and 19th December 2018. The workshop was on Student Counseling and Carrier Guidance. Following session were included in entre two day workshop as such

### Date: 18th December 2018

**3.1 Inaugurations Function:**

Workshop inaugurated on 18th December 2018 by Dr. Sanjay Moon (Coordinator, Lifelong Learning & Extension Department, Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad). He stated that, this department runs for development of people and empowered them. Education must useful for the people in their daily life. The syllabus must prepared on the functional bases.

The session was chaired by the Principal Dr. S.R. Takle and introduced by Dr. P.M. Kalyankar.

**3.2 Second Session : Writing Skill**

Dr. Anand Ublae (Assistant Professor, Department of English Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University., Aurangabad) has delivered lecturer on the writing skill. Why to write? What to write ? These are important questions. The writing is best writing, which is for the welfare of society.

**3.3 Third Session: Communicative Skill**

In the second Dr. Uttam Ambhore (Head &Professor, Dept. Of English, Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University., Aurangabad) has delivered lecturer on the Communicative Skill. He stated that communicative skill is not only important in for jobs but it has wide scope.

The first day session were encored by Dr. Mahesh Thorat & volunteers Lakshimekant Deple and gratitude by Joti Ude .

### Date: 19th December 2018

**3.4 Fourth Session: Facing Competitive Examination**

Dr. Bhagyat Wagh has delivered lecturer on Facing Competitive exams. He pointed out that the competitor must understand the syllabus, than reading of reference books, prepare of self-notes, time managements and develop writing skill these are important thing for facing any competitive exam.

This session has chaired by Dr. Mahesh Thorat and Dr. Kalyankar P.M. introduced this session.

### 3.5 Fifth Session: Carrier Guidance

Shri Gajana Harkla has delivered lecturer on Carrier opportunity in various after graduation. He has also given information about various courses and jobs opportunity after complication these courses. He has delivered his lecture with help of PPT on projector.

### 3.6 Sixth Session: Valedictory Session – Résumé for Job

Sixth session that is valedictory session of the workshop was arranged on **Résumé for Job**. This session was on the guidelines for students regarding how to make Resume Associate Professor, Vijay Pande and Dr. Manjusha Nalgirkar provided basic details in making Resume. They pointed that students must mentioned his skill in his resume, that are help full in getting jobs.

The second day sessions are anchored by Joti Ude and gratitudes by Shri Babasaheb Lahane

## 4. Implementation Self-financed Certificate Courses

By this department two Self-financed Certificate Courses have been implemented in 2018-19. One is **Certificate course in Communicative English** and another is **Sales Representative**; 06 and 29 students have been taken admission for these courses respectively. Dr. Ashivan Rajanikar is the coordinator of the Communicative English course and Dr. Mahesh Thorat and Assistant Prof. Nitin Malegaonkar are coordinators of Sales Representative Course.

**Programme Officer**
Dr.P.M. Kalyankar

**Principal**
Dr.S.R.Takle
PRINCIPAL
Shri Sa... ... Mahavidhyalaya,
Phulambri. Tq. Phulambri. Dist. Aurangabad.

# फोटो अहवाल २०१८-१९

## महाविद्यालयस्तर उपक्रम



महाविद्यालयात रोपे तयार करण्यासाठी पिशव्या भरतांना स्वयंसेविका





सिडबॉलची निर्मिती करतांना विद्यार्थी



सिडबॉलची निर्मिती करतांना स्वयंसेवक



सिडबॉलची निर्मिती करतांना विद्यार्थ्यांसोबत कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याणकर पी. एम.




स्वयंसेवक व विद्यार्थ्यांनी तयार केलेले सिडबॉल



विद्यापीठ वर्धापनदिनी विद्यापीठ ध्वजारोहन कार्यक्रमास उपस्थित कर्मचारी व विद्यार्थी



विद्यापीठ वर्धापनदिनी आयोजित व्याख्यानाचे प्रास्ताविक करतांना डॉ. कल्याणकर पी. एम.



विद्यापीठ वर्धापनदिनी आयोजित व्याख्यान कार्यक्रमात उच्च शिक्षणाचा विकास या विषयावर बोलतांना डॉ. उमाकांत राठोड





विद्यापीठ वर्धापनदिनी आयोजित कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य डॉ. एस. आर. टकले



अंतरराष्ट्रीय साक्षरतादिनी व्याख्यान देतांना डॉ. प्रशांत देशमुख



अंतरराष्ट्रीय साक्षरतादिनी आयोजित व्याख्यान कार्यक्रमाचा
अध्यक्षीय समारोप करतांना डॉ. कल्याणकर पी. एम.



विद्यापीठ नामविस्तारदिनी आयोजित कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना डॉ. कल्याणकर पी. एम.



विद्यापीठ नामविस्तारदिनी आयोजित कार्यक्रमात विद्यापीठ नामविस्तार चळवळ या विषयावर मार्गदर्शन करतांना डॉ. संतोष तांदळे




विद्यापीठ नामविस्तारदिनी आयोजित कार्यक्रमात
मनोगत व्यक्त करतांना माजी विद्यार्थी श्री. रमेश तुपे

# समाजस्तरावरील उपक्रम



निधोना येथे करिअरच्या संधी या विषयावर मार्गदर्शन करतांना श्री. गजानन हरकळ



निधोना येथे करिअरच्या संधी या व्याख्यान कार्यक्रमास लाभलेला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद



आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनी फुलंब्री गावात काढण्यात आलेली रॅली






आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनी फुलंब्री बस स्थानकात पथ नाट्य सादर करतांना स्वयंसेवक





आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनी फुलंब्री येथील खुलताबाद टी पॉईटला पथ नाट्य सादर करतांना स्वयंसेवक





आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनी फुलंब्री येथील खुलताबाद टी पॉईंटला पथ नाट्य सादर करतांना स्वयंसेवक




दि. २६ जानेवारी २०१९ रोजी दरेगाव (दरी) येथे आयोजित व्याख्यान कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना डॉ. कल्याणकर पी. एम.




प्रजासत्ताकदिनी दरेगाव (दरी) गावातील नागरिकांना कुष्ठरोगाची
शपथ देतांना ग्रामसेवक श्री. सुरडकर




प्रजासत्ताकदिनी दरेगाव (दरी) येथे आयोजित व्याख्यान कार्यक्रमात
मार्गदर्शन करतांना प्रा. बाबासाहेब लहाने




प्रजासत्ताकदिनी दरेगाव (दरी) येथे आयोजित व्याख्यान कार्यक्रमात ग्रामपंचायतींची भूमिका या विषयावर मार्गदर्शन करतांना डॉ. आर. व्ही. लोमटे




प्रजासत्ताकदिनी दरेगाव (दरी) येथे आयोजित व्याख्यान कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करतांना श्री. शामराव मालोदे

# विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा



विद्यार्थी समुपदेशन व व्यवबास मार्गदर्शन कार्यशाळेचे दीप प्रज्वलन करुन उद्‌घाटन करतांना
डॉ. उत्तम अंभोरे, डॉ. संजय मुन, डॉ. आनंद उबाळे, प्राचार्य डॉ. एस. आर. टकले



कार्यशाळेत उद्‌घाटन कार्यक्रमात प्रार्थना म्हणतात स्वयंसेविका



विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेत बीजभाषण करतांना डॉ. संजय मुन



कार्यशाळेस लाभलेला विद्यार्थ्यांच्या प्रतिसाद



विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेत लेखन कौशल्य या विषयावर बोलतांना डॉ. आनंद उबाळे



व्याख्यान ऐकतांना विद्यार्थी



विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेत संभाषण कौशल्य या विषयावर बोलतांना डॉ. उत्तम अंभोरे



पहिल्या दिवसाच्या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य डॉ. एस. आर. टकले



पहिल्या दिवसाच्या कार्यक्रमाचे आभार व्यक्त करतांना स्वयंसेविका कु. ज्योती उदे



व्यासपिठावर डॉ. संजय मुन, डॉ. उत्तम अंभोरे, डॉ. आनंद उबाळे, प्राचार्य डॉ. एस. आर. टकले




विद्यार्थी समुपदेशन व व्यावसाय मार्गदर्शन कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना डॉ. कल्याणकर पी. एम.




विद्यार्थी समुपदेशन व व्यावसाय मार्गदर्शन कार्यशाळेत स्पर्धा परिक्षांना सामोरे जातांना या विषयावर मार्गदर्शन करतांना डॉ. भागवत वाघ




स्पर्धा परिक्षांना सामोरे जातांना या व्याख्यान सत्राचा समारोप करतांना डॉ. महेश थोरात




कार्यशाळेत करिअरच्या संधी या विषयावर मार्गदर्शन करतांना श्री. गजानन हरकळ




कार्यशाळेत नौकरी संदर्भातील परिचय पत्र या विषयावर मार्गदर्शन करतांना प्रा. विजय पांडे




कार्यशाळेस दुसऱ्या दिवशी लाभलेला विद्यार्थी प्रतिसाद




कार्यशाळेत नोकरी संदर्भातील परिचय पत्र या विषयावर
मार्गदर्शन करतांना डॉ. मंजुषा नळगीरकर




कार्यशाळेत सहभागी विद्यार्थ्यांचा ग्रुप

# Lifelong Learning and Extension Department

## Publicity 2018-2019

**दिव्य मराठी विशेष** प्रतिष्ठान महाविद्यालयाचे डॉ. उमाकांत राठोड यांचे फुलंब्री येथे प्रतिपादन, विद्यार्थ्यांची मोठी उपस्थिती

24·08·2018

# शिक्षणाने समाजाचा शाश्वत विकास घडतो

प्रतिनिधी | फुलंब्री

शिक्षणाने समाजाचा शाश्वत विकास होतो. तसेच जगण्याची क्षमता वाढीस लावणे हा उद्देश शिक्षणाने साध्य केला पाहिजे, असे प्रतिपादन पैठण येथील प्रतिष्ठान महाविद्यालयाचे डॉ. उमाकांत राठोड यांनी फुलंब्री येथे केले.

फुलंब्री येथील संत सावता महाविद्यालयातील आजीवन शिक्षण विस्तार सेवा विभागाच्या वतीने समाज स्तरावरील उपक्रमांतर्गत 'भारतातील उच्च शिक्षणाचा विकास' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या वेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून पैठण येथील प्रतिष्ठान महाविद्यालयाचे डॉ. उमाकांत राठोड हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे डॉ. [illegible] होते.



'भारतातील उच्च शिक्षणाचा विकास' या विषयावर बोलताना मान्यवर.

डॉ. राठोड म्हणाले की, शिक्षणाची परंपरा अतिप्राचीन अशी आहे. अतिप्राचीन काळापासून शिक्षणाने मानवाची आणि एकूणच समाजाची उन्नती साधली आहे. प्राचीन शिक्षणाची परंपरा सांगत असताना वैदिक शिक्षणाचा आढावा घेतला. समाजव्यवस्थेची घडी बळकट करण्यासाठी विविध स्तरांवर शिक्षणाची गरज असते. या देशातील शिक्षण जर मजबूत करायचे असेल तर प्राथमिक शिक्षण मजबूत करावे लागेल. यासोबत शिक्षण कार्यक्रम असायला हवे. शिक्षण ही सामाजिक आणि अत्यावश्यक गरज आहे, ती सरकारने पुरवली पाहिजे. कारण कल्याणकारी समाज निर्मितीसाठी शिक्षण महत्त्वाची भूमिका बजावते. शिक्षणाने समाजाचा शाश्वत विकास होतो. कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी मांडली. अध्यक्षीय समारोप प्राचार्य एस. आर. टकले यांनी केला. उपस्थितांचे [illegible] विद्यार्थिनीने आभार मानले. सूत्रसंचालन [illegible] यांनी केले. पाहुण्यांचा परिचय [illegible] यांनी करून दिला.

# शिक्षणाने समाजाचा शाश्वत विकास व जगण्याची क्षमता वाढीस लावावी-डॉ. उमाकांत राठोड



फुलंब्री टाईम्स 27·08·2018

फुलंब्री (प्रतिनिधी)- येथील श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील आजीवन शिक्षण विस्तार सेवा विभागाच्या वतीने समाज स्तरावरील उपक्रमांतर्गत दिनांक २३ ऑगस्ट २०१८ रोजी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. उमाकांत राठोड (प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण) तर प्रमुख उपस्थिती डॉ. [illegible] (देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद) यांची होती. डॉ. उमाकांत राठोड यांनी 'भारतातील उच्च शिक्षणाचा विकास' या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. बोलताना डॉ. राठोड म्हणाले की, शिक्षणाची परंपरा मोठी आणि अतिप्राचीन अशी आहे. अतिप्राचीन काळापासून शिक्षणाने मानवाची आणि एकूणच समाजाची उन्नती साधली आहे. प्राचीन शिक्षणाची परंपरा सांगत असताना वैदिक शिक्षणाचा आढावा घेतला.

समाजव्यवस्थेची घडी बळकट करण्यासाठी विविध स्तरांवर शिक्षणाची गरज असते. या देशातील शिक्षण जर मजबूत करायचे असेल तर प्राथमिक शिक्षण मजबूत करावे लागेल. यासोबत शिक्षण कार्यक्रम असायला हवे. शिक्षण ही सामाजिक आणि अत्यावश्यक गरज आहे ती सरकारने पुरवली पाहिजे. कारण कल्याणकारी समाज निर्मितीसाठी शिक्षण महत्त्वाची भूमिका बजावते. शिक्षणाने समाजाचा शाश्वत विकास होतो. तसेच जगण्याची क्षमता वाढीस लावणे हा उद्देश शिक्षणाने साध्य केला पाहिजे. परंतु अलीकडे असे होताना दिसत नाही तर शिक्षणाने [illegible] आहे. [illegible] शिक्षणासाठी [illegible] उच्च शिक्षणाने निर्माण केली पाहिजे. असे मत व्यक्त केले. [illegible] शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झाले पाहिजे. परंतु हे [illegible] [illegible] नाही. [illegible] दृष्टी आणि [illegible] दिला जात नाही. [illegible] दृष्टी [illegible] पाहिजे. [illegible] केले. [illegible] शिक्षणक्षेत्रातील [illegible] दिली.

कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी मांडली. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी केला. [illegible] कु. [illegible] या विद्यार्थिनीने मानले. सूत्रसंचालन कु. [illegible] यांनी केले. पाहुण्यांचा परिचय [illegible] यांनी करून दिला. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

# प्राथमिक शिक्षणाच्या बळकटीकरणाची गरज- डॉ. उमाकांत राठोड



तालुका प्रतिनिधी / २४ ऑगस्ट

फुलंब्री : शिक्षणाची परंपरा मोठी आणि अतिप्राचीन अशी आहे. अतिप्राचीन काळापासून शिक्षणाने मानवाची आणि एकूणच समाजाची उन्नती साधली आहे. प्राचीन शिक्षणाची परंपरा सांगत असताना वैदिक शिक्षणाचा ऊहापोह केला. देशातील शिक्षण जर मजबूत करायचे असेल तर प्राथमिक शिक्षण मजबूत करण्याची गरज असल्याचे डॉ. उमाकांत राठोड यांनी सांगितले. श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील आजीवन शिक्षण विस्तार सेवा विभागाच्या वतीने समाज स्तरावरील उपक्रमांतर्गत दिनांक २३ ऑगस्ट २०१८ रोजी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. उमाकांत राठोड ( प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण) तर प्रमुख उपस्थिती डॉ. उल्हास उडाण (देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद) यांची लाभली. डॉ. उमाकांत राठोड यांनी 'भारतातील उच्चशिक्षणाचा विकास' या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले.

डॉ. राठोड म्हणाले की, शिक्षण ही सामाजिक आणि अत्यावश्यक गरज आहे ती सरकारने पुरविली पाहिजे. कारण कल्याणकारी समाज निर्मितीसाठी शिक्षण महत्त्वाची भूमिका बजावते. शिक्षणाने समाजाचा शाश्वत विकास होतो. तसेच जगण्याची क्षमता वाढीस लागणे हा उद्देश शिक्षणाने साध्य केला पाहिजे. कार्यक्रमाची रूपरेषा डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी मांडली. अध्यक्षीय समारोप प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांनी केला. तर उपस्थित पाहुण्यांचे आभार कु. हर्षदा खोंडे या विद्यार्थीनीने मानले. सूत्रसंचलन कु. अश्विनी बनसोडे हिने केले. पाहुण्यांचा परिचय कु. विद्या जाधव हिने करून दिला.

यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

देशोन्नती - 25.08.2018.

**दिव्य मराठी विशेष** फुलंब्रीत 'साक्षरता काळाची गरज' या विषयावर विविध चौकांमध्ये केले पथनाट्याचे सादरीकरण

दै. दिव्य मराठी - 11.09.2018

# भारतामध्ये स्त्री-पुरुष साक्षरतेमधील तफावत दूर झालीच पाहिजे : प्रा. डॉ. प्रशांत देशमुख

प्रतिनिधी । फुलंब्री

भारतात साक्षरतेच्या दरात स्त्री व पुरुष यांच्या साक्षरतेमध्ये तफावत आहे, ती दूर झाली पाहिजे, शिक्षणातील गळतीचे प्रमाण कमी झाले पाहिजे, असे प्रतिपादन सोयगावच्या श्री संत ज्ञानेश्वर महाविद्यालय अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रशांत देशमुख यांनी फुलंब्री येथे बोलताना केले.



श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाच्या वतीने शनिवारी (दि.८) सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस म्हणून साजरा केला. या दिवसाचे औचित्य साधत प्रस्तुत महाविद्यालयापासून दिंडीचे आयोजन केले. या दिंडीत साक्षरतेच्या संदर्भात विविध घोषवाक्य म्हटली व या दिंडीत 'साक्षरता काळाची गरज' या विषयावरील पथनाट्याचे सादरीकरण विविध चौकात केले. माजी विद्यार्थी पंकज साळवे यांनी बसवून घेतलेल्या या पथनाट्यात रोहित शिंदे, हर्षदा खोंडे, विद्या जाधव, सुप्रिया जाधव, शिवम जाधव, अमोल ढवळे, पूजा केजभट, मृणाली मनोरकर या विद्यार्थ्यांनी भूमिका वठवल्या. या दिंडीच्या आयोजनासाठी डॉ. पांडुरंग कल्याणकर, प्रा. नितीन माळेगावकर, डॉ. संजीवकुमार पांचाळ यांनी परिश्रम घेतले.

यानंतर महाविद्यालयात 'साक्षरता काळाची गरज' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी बोलताना डॉ. देशमुख म्हणाले की, युनेस्कोने २६ ऑक्टोबर १९६६ रोजी ८ सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन म्हणून घोषित केला.

या दिवसाचा हेतू म्हणजे व्यक्तिगत, सामूहिक व सामाजिक जीवनातील महत्त्वावर प्रकाश टाकणे हा आहे. मानवी जीवनाची गुणवत्ता वाढवणे हा हेतू आहे. लिहिणे आणि वाचणे म्हणजे साक्षरता नव्हे, तर त्यापलीकडे संगणक साक्षरता व वित्तीय साक्षरता ही देखील काळाची गरज आहे. भारतात साक्षरतेच्या दरात स्त्री व पुरुष यांच्या साक्षरतेमध्ये तफावत आहे, ती दूर झाली पाहिजे, शिक्षणातील गळतीचे प्रमाण कमी झाले पाहिजे. यासोबतच साक्षरतेतून सुजाण नागरिक निर्माण व्हावा ही अपेक्षा व्यक्त केली. प्रास्ताविक डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी केले. अध्यक्षीय समारोप उपप्राचार्य डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी केला.



फुलंब्री : संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. प्रशांत देशमुख.

दै. सकाळ - 12.09.2018

# जागतिक साक्षरता दिन साजरा

फुलंब्री, ता. ११ (बातमीदार) : श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाच्या वतीने शनिवारी (ता. आठ) आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस साजरा करण्यात आला. महाविद्यालयापासून शहरातपर्यंत दिंडी काढण्यात आली. या दिंडीत 'साक्षरता काळाची गरज' या विषयावरील पथनाट्याचे सादरीकरण येथील विविध चौकात करण्यात आले. माजी विद्यार्थी पंकज साळवे यांनी बसवून घेतलेल्या या पथनाट्यात रोहित शिंदे, हर्षदा खोंडे, विद्या जाधव, सुप्रिया जाधव, शिवम जाधव, अमोल ढवळे, पूजा केजभट, मृणाली मनोरकर या विद्यार्थ्यांनी भूमिका वठवल्या. यासाठी आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. पांडुरंग कल्याणकर, प्रा. नितीन माळेगावकर, डॉ. संजीवकुमार पांचाळ यांनी पुढाकार घेतला. डॉ. कल्याणकर यांनी प्रास्ताविक केले. 'साक्षरता काळाची गरज' या विषयावर डॉ. प्रशांत देशमुख यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यासाठी राजू जाधव, लक्ष्मण केपले, श्री. निराळे यांनी पुढाकार घेतला.

सांजवार्ता

# आंबेडकरांनी शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली -तांदळे

फुलंब्री,दि.१७ (प्रतिनिधी): : मराठवाड्यात नामविस्ताराचा लढा अतिशय व्यापकपणे लढला गेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली तसेच सर्वांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. त्यामुळे विद्यापीठाला त्यांचे नाव द्यावे असा आग्रह अरुण कांबळे, नामदेव ढसाळ, गंगाधर गाडे यांचा होता. हा लढा खरा स्वातंत्र्य, समता व बंधुता जोपासण्याचा लढा होता.असे प्रतिपादन तांदळे यांनी केले.

संत सावता माळी महाविद्यालयात आजीवन शिक्षण विस्तार विभागाच्या वतीने विद्यापीठ नामविस्तार दिनानिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. संतोष तांदळे यांनी 'विद्यापीठ नामविस्तार चळवळीतील नेतृत्व' या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. एस. आर. टकले,तर प्रमुख उपस्थिती म्हणून रमेश दुपे यांची उपस्थिती होती.

सांजवार्ता

# गावाच्या विकासात आरोग्य, शिक्षण महत्वाचे : डॉ.लोमटे



फुलंब्री ,दि.१ (प्रतिनिधी): गावचे आरोग्य आणि शिक्षण या दोन बाबी गावाच्या विकासात महत्वाची 'भूमिका बजावत असतात. म्हणून या दोन गोष्टीकडे गावाने लक्ष देने आवश्यक आहे,असे प्रतिपादन डॉ. लोमटे यांनी केले.

शहरातील श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील आजीवन शिक्षण आणि विस्तार सेवा विभागाच्या वतीने मौजे दरेगाव दरी येथे ग्रामविकासात ग्रामपंचायतीची भूमिका या विषयावर आयोजित व्याख्यान ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्यामराव मालोदे होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी केले. . तर ज्योती उदे हीने आभार मानले. यावेळी ग्रामविकास अधिकारी, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, नागरीक व महाविद्यालयाचे विध्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सावता महाविद्यालयात देरेगाव दरीत व्याख्यान

फुलंब्री, प्रतिनिधी : येथील संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील आजीवन शिक्षण आणि विस्तार सेवा विभागाच्या वतीने देरेगाव दरी येथे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक श्यामराव मालोदे हे होते. याप्रसंगी डॉ. रामकिसन लोमटे व प्रा. बाबासाहेब लहाने यांनी 'ग्रामविकासात ग्रामपंचायतीची भूमिका' या विषयावर मार्गदर्शन केले. प्रास्ताविक डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी केले. यावेळी गावातील नागरिक, प्राध्यापक आदी उपस्थित होते.

Aurangabad Gramin Edition
31 Jan, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

सांजवार्ता
23.12.2016

# विद्यार्थी समुपदेशन, व्यवसाय कार्यशाळा



फुलंब्री,दि.२२ (प्रतिनिधी): डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय यांच्या वतीने आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या वतीने विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाचे संचालक डॉ. संजय मून यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस.आर. ठगले उपस्थित होते.

कार्यशाळेची भूमिका आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाचे समन्वयक, डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी मांडली. शिक्षण क्षेत्रात सातत्याने बदल होत असून या बदलामागची धारणा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली पाहिजे, परंतु या भूमिका वा धारणा त्यांच्यापर्यंत पोहोचत नाहीत. त्यामुळे विद्यार्थी शिक्षणाबाबत उदासीन असल्याचे मत डॉ.मून यांनी व्यक्त केले. कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात विद्यापीठातील इंग्रजी विभागाचे प्राध्यापक डॉ. आनंद उबाळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दिव्यमराठी - 22.12.2018

# ...तरच शिक्षणाकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन निर्माण होईल

## आजीवन शिक्षण व विस्तार विभाग संचालक डॉ. संजय मून यांचे प्रतिपादन

**प्रतिनिधी** | फुलंब्री

विद्यार्थ्यांचे मानसिक सामर्थ्य व बौद्धिक सामर्थ्य विकसित केले पाहिजे. तसेच ती वापरात आली तरच समाजाचा आणि देशाचा विकास होत असतो. विद्यार्थ्यांनी घेतलेल्या ज्ञानाचे व्यवहारात उपयोजन केले तरच शिक्षणाकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन निर्माण होईल, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग संचालक डॉ. संजय मून यांनी केले.

फुलंब्री येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या वतीने विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी ते बोलत होते. उद्घाटन डॉ. संजय मून यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.एस.आर. टकले होते. कार्यशाळेची भूमिका डॉ.पांडुरंग कल्याणकर यांनी मांडली. डॉ. मून म्हणाले की, शिक्षण क्षेत्रात सातत्याने बदल होत आहेत. या बदलामागची धारणा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली पाहिजे, परंतु या भूमिका वा धारणा त्यांच्यापर्यंत पोहोचत नाहीत. त्यामुळे विद्यार्थी शिक्षणाबाबत उदासीनता मानतात. खरे तर शिक्षणाने विद्यार्थ्यांमधील क्षमता विकसित केल्या पाहिजेत. विद्यार्थ्यांचे मानसिक सामर्थ्य व बौद्धिक सामर्थ्य विकसित केले पाहिजे. तसेच ती वापरात आली तरच समाजाचा आणि देशाचा विकास होत असतो. विद्यार्थ्यांनी घेतलेल्या ज्ञानाचे व्यवहारात उपयोजन केले तरच शिक्षणाकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन निर्माण होईल, असे मत व्यक्त केले. डॉ. उबाळे म्हणाले की, मानवाला भाषेशिवाय संवाद साधता येत नाही. प्रत्येक भाषेचे कौशल्य त्या त्या भाषेत दडलेले असतात. त्याचा शोध घेणे ही बाब महत्त्वाची आहे. म्हणून ऐतिहासिक संदर्भ देत लेखन कौशल्ये मांडली. पुढे ते असेही म्हणाले की, भाषा ही उत्क्रांत झालेली बाब आहे. तसेच लोकांच्या काळजाला हात घालणारे लेखन कौशल्ये श्रेष्ठ समजायला हवीत. लेखन हे आयुष्य सुंदर करणारे हवे, असे मत व्यक्त केले. सूत्रसंचालन डॉ. महेश थोरात, ज्योती उदे, लक्ष्मीकांत ढेपले केले. आभार प्रा. बाबासाहेब लहाने यांनी मानले. यशस्वितेसाठी प्राचार्य डॉ. एस. आर. टकले, डॉ. पांडुरंग कल्याणकर उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद संलग्नित

व

पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री.

### आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग

## विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा

**दिनांक : १८ ते १९ डिसेंबर २०१८**

## निमंत्रण पत्रिका

श्री / श्रीमती ______________________________

आपणास कळविण्यात येते की, आमच्या महाविद्यालयातील आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या वतीने दि.१८ ते १९ डिसेंबर २०१८ या कालावधीत दोन दिवसीय विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन केले आहे. तरी आपण या कार्यशाळेत सहभागी व्हावे ही विनंती.

### कार्यशाळेतील उपक्रम

**मंगळवार, दिनांक १८ डिसेंबर २०१८**

सत्र पहिले
उद्घाटन सत्र:-वेळ: सकाळी ११:०० ते १२:००
**उद्घाटक व बीजभाषक :- डॉ. संजय मून**
(संचालक, आजीवन शिक्षण व विस्तार विभाग, डॉ.बा.आं.म.वि.)
**अध्यक्ष:- प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले**

सत्र दुसरे :-वेळ १२:०० ते १:३०
विषय : संभाषण कौशल्य
**वक्ते :- प्रो. डॉ. उत्तम अंभोरे**
(विभाग प्रमुख, इंग्रजी विभाग, डॉ.बा.आं.म.वि.)
विषय : लेखन कौशल्य
**वक्ते :- डॉ. आनंद उबाळे**
(सा.प्राध्यापक, इंग्रजी विभाग, डॉ.बा.आं.म.वि.)

अल्पोपहार १.३० ते २.००

सत्र तिसरे:- वेळ: २.०० ते ३.३०
विषय : व्यक्तीमत्त्व विकास
**वक्ते:-डॉ. मुस्तजीब अहमद खान**
(संचालक, विद्यार्थी विकास विभाग, डॉ.बा.आं.म.वि.)

**बुधवार, दिनांक १९ डिसेंबर २०१८**

सत्र चौथे :- वेळ: ११.०० ते १२.३०
विषय :-यशस्वी उद्योजकाची मुलाखत
**उद्योजक :- श्री. ए. व्ही. मेटे**
(उद्योजक, साई इंटरप्राईजेस, एमआयडीसी, वाळूज)
**मुलाखत घेणारे :- डॉ. महेश थोरात**

सत्र पाचवे:- वेळ:१२.३० ते १.३०
विषय :-स्पर्धा परीक्षांना सामोरे जाताना
**वक्ते:-डॉ. भागवत बाब**
(द युनिक ॲकॅडमी, पुणे, शाखा औरंगाबाद)

अल्पोपहार १.३० ते २.००

सत्र सहावे :- वेळ २:०० ते ३:००
विषय: करिअर मार्गदर्शन
**वक्ते:-श्री गजानन हरकळ**

समारोप सत्र :- वेळ ३:०० ते ४:००
विषय: नौकरीसंदर्भातील परिचयपत्र
**वक्ते:-प्रा. विजय पांढे व डॉ. मंजुषा नळगीरकर**

**विनीत**

कार्यक्रमाधिकारी
डॉ.पी.एम.कल्याणकर, ९५४५८९९४८४

प्राचार्य
डॉ.एस.आर.टकले